# साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी

मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार
मो.नं. ९०९६९६८३४०

कार्यालय : ब्लॉक नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com

श्री. अकिल अहमद उर्फ गुड्डुभाई
नागपूर विभाग संपादक
मो.नं. ९११२२७४११००

दैनिक **साहसिक** — सजग समाजाचा दक्ष प्रहरी

epaper
www.sahsik.com








वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १३ अंक : १० मंगळवार ०२ जुलै २०१९ मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार (पाटील) (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये


### सुविचार

जन्मामुळे नव्हे,
तर केवळ सद्गुनामुळेच
आपण थोर बणतो.
थारे कृती हीच थोर
मनाची साक्षीदार आहे.

### चारोळी

या हजारोंच्या गर्दीत
असा एक मित्र हवा...
खांद्यावर हात ठेवून म्हणेल
घाबरू नको भावा...!

### हसा जरा जपून..

**डिलिवरीच्या वेळेस ...**
**बायको :** देवा, मुलगा होऊ दे...
**नवरा :** देवा, मुलगी होऊ दे प्लीज
**देव :** माकडांनो गप्प बसा, नाही तर असा आयटम बनवेल, कि तुम्ही दोघेपण रडत बसाल, आणि तो टाळी वाजवेल...

# अण्णा हजारेंच्या प्रकरणात आरोपींना वाचविण्यासाठी बेकायदेशीर आदेश पारित केल्याप्रकरणी न्या.अभय ओक व न्या. अनुजा प्रभुदेसाई यांच्या भ्रष्टाचाराविरोधात फौजदारी केस दाखल

* थोर समाजसेवक अण्णा हजारे यांच्या याचिकेत २५ हजार कोटींच्या भ्रष्टाचारात शरद पवार व अजित पवारांना वाचविण्यासाठी बेकायदेशीर आदेश पारित केल्याचे पुरावे
* सामाजिक कार्यकर्ते विश्वास बांबुरकर यांच्या ४० हजार कोटींच्या अपहार प्रकरणात फिर्यादींविरुद्ध बेकायदेशीर आदेश दिल्याचा आरोप
* डॉ.संतोष शेट्टी यांच्या प्रकरणात आरोपी महिलेला वाचविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना करून ३४० Cr.P.C मध्ये बेकादेशीर आदेश पारित केल्याची तक्रार
* ५ हजार कोटी रुपयांच्या भूखंड गैरव्यवहार प्रकरणात स्टिंग ऑपरेशनमध्ये फसलेले न्या.काथावाला यांना वाचविण्यासाठी फिर्यादी, साक्षीदार व सामाजिक कार्यकर्त्याविरुद्ध बेकायदेशीर कोर्ट अवमानाची कारवाई सुरु केल्याचे पुरावे सादर
* दोन्ही न्यायाधीशांना त्वरित बडतर्फ करण्याची मागणी
* देशभर जनआंदोलन उभारणार
* अण्णा हजारेंचा जेल भरो आंदोलनाचा इशारा

**विशेष प्रतिनिधी / ०१ जुलै**

**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाचे तत्कालीन वरिष्ठ न्यायाधीश अभय ओक आणि न्या.अनुजा प्रभुदेसाई यांनी हजारो कोटींच्या भ्रष्टाचाराच्या विविध प्रकरणात आरोपींना वाचविण्यासाठी स्वत:च्या पदाचा दुरुपयोग करून बेकायदेशीर आदेश पारित करून अण्णा हजारेंसारख्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांना व देशहितासाठी लढणाऱ्या लोकांना हतोत्साहित करण्याच्या उद्देशाने व आरोपींना अभय व उत्तेजन देऊन त्यांना गैरफायदा पोहचून न्यायव्यथेबद्दल जनतेच्या मनात आदर वाढविण्या ऐवजी कमी करणारे आदेश पारित केल्याप्रकरणाची दखल घेऊन इंडियन बार असोसिएशनचे महाराष्ट्र ॲन्ड गोवाचे अध्यक्ष ॲड. विजय कुर्ले यांनी सर्व पुराव्यासह तक्रार मा. राष्ट्रपती व मा.सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश याच्याकडे दाखल करून दोन्ही न्यायाधीशांविरुद्ध भा.दं.वि २१८,२१९,२११,१६७,४०९ R/W १२० (B),३४ अंतर्गत फौजदारी कारवाई तसेच न्या. कर्णण प्रमाणे कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाई त्वरित करावी तसेच चौकशीच्या काळात **''इन-हाऊस-प्रोसीजर''**नुसार दोन्ही न्यायाधीशाकडून सर्व कामे काढून घेऊन त्यांना राजीनामा देण्यास सांगावे अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागणीसाठी अनेक वकील व सामाजिक संघटनांनी पाठिंबा दर्शविला असून कारवाई न झाल्यास लवकरच राज्यभर जेल-भरो आंदोलन करण्यात येईल. त्यामध्ये अण्णा हजारेही सामील होणार असल्याची माहिती ॲड.विजय कुर्ले यांनी दिली.

या बाबत सविस्तर वृत्त असे की जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी साखर कारखान्यांच्या विविध घोटाळ्यामध्ये शरद पवार व अजित पवार यांनी एकूण २५ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे पुरावे सादर करून प्रकरणाचा तपास सी.बी.आय. (C.B.I.) मार्फत करण्याकरिता मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. ४२/२०१६ ही दाखल केली होती.

ती याचिका सुनावणीसाठी दि.६ जानेवारी २०१७ रोजी न्या.अभय ओक व न्या. अनुजा प्रभुदेसाई यांच्या खंडपीठापुढे आली.

कायद्यातील तरतूदीप्रमाणे व सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाने अश्या प्रकरणात सी. बी.आय. चौकशीचे आदेश द्यावेत त्याकरीता पहिले पोलीसात जाण्याची गरज नाही असा कायदा ठरवून दिला आहे. न्या.डी. वाय. चंद्रचूड यांनी प्रोविडेंट इन्व्हेस्टमेंट MANU / MH / 0054/ 2012 प्रकरणात आणि न्या. ए.एम. खानविलकर यांनी चारू किशोर मेहता 2011 ALL MR (Cri) 173 या प्रकरणात असाच कायदा ठरवून दिला असून जनहिताच्या प्रकरणात उच्च न्यायालयास साधे पत्र जरी पाठविले. तरी त्या आधारे सी.बी.आय. चौकशीचे आदेश देण्याचे अधिकार उच्च न्यायालयास असून सोहराबुद्धीन शेख प्रकरणात अश्याच प्रकारे पत्राच्या आधारावर सी.बी.आय. चौकशीची कारवाई करण्यात आली होती.

परंतु न्या.अभय ओक याच्या खंडपीठाने कायद्याबाहेर जाऊन अण्णा हजारेंच्या याचिकेवर त्यांना याआधी पोलिसात जाऊन तक्रार करण्याचा सल्ला दिला व आजपर्यंत २ वर्ष ६ महिन्यापासून ती याचिका प्रलंबित ठेवली आहे. अश्याप्रकारे न्या. अभय ओक यांनी बेकायदेशीरपणे पदाचा दुरुपयोग करून आरोपींना गैरफायदा पोहचविण्याकरीता कायद्याविरुद्ध काम केल्याचे स्पष्ट होत असून अश्या न्यायाधीशाला भा.दं.वि.चे कलम २१८,२१९ मध्ये ७ वर्षाच्या शिक्षेची तरतूद आहे असे तक्रारीत म्हटले आहे.



अश्याच एकां दुसऱ्या प्रकरणात मुंबईतील एअरपोर्ट संदर्भात जी.व्ही.के कंपनीला कंत्राट देताना ४० हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचीं जनहित याचिका सामाजिक कार्यकर्ते विश्वास बांबुरकर यांनी दाखल केली होती. ती याचिका त्याचं दोन न्यायाधीशांपुढे सुनावणीस आली असता त्यांनी दि. ७ मार्च २०१७ रोजी याचिकाकर्त्यास सन २०१५ मध्ये फेसबूकवर न्यायालयाबद्दल लेख का लिहला हे कारण सांगून कोर्ट अवमाननाची नोटीस काढली. सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे त्याच मुद्यांवर आधीच प्रकरण चालवून मुंबई उच्च न्यायालयाचे न्या.व्ही.एम. कानडे यांच्या खंडपीठाने आधीच याचिकाकर्त्यास तंबी देऊन ते प्रकरण संपविले होते. भारतीय राज्यघटनेचे कलम २० (२) आणि फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३०० नुसार पुन्हा त्याच प्रकरणात दुसरी कारवाई करता येत नाही अशी तरतूद आहे.

(उर्वरित पान २ वर)

---

## मुंबईत पाणी तुंबले नाही, वाहतूक कोंडीही नाही; महापौरांचा अजब दावा



**विशेष प्रतिनिधी/ ०१ जुलै**

**मुंबई:** शहरामध्ये सोमवारी झालेल्या मुसळधार पावसात कुठेही पाणी तुंबले नाही, असा अजब दावा महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी केला आहे. गेल्या तीन दिवसांपासून मुंबईत सतत पाऊस सुरु आहे. सोमवारी सकाळी या पावसामुळे मुंबईतील वाहतूक व्यवस्थेची पूर्णपणे दाणादाण उडाली. मुंबईतील अनेक भागात पाणी तुंबले. अनेक रस्त्यांवर खड्डे पडल्याने मुंबई महापालिका प्रशासनाने केलेले दावे पुन्हा एकदा फोल ठरले.

मात्र, महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी मात्र हे सर्व दावे फेटाळून लावले आहेत. मुंबईत कुठेही पाणी तुंबले नाही. तसेच रस्त्यावर कुठेही वाहतूक कोंडी झाली नाही. सिग्नलवर गाड्या थांबल्या असतील तर ती वाहतूक कोंडी म्हणायची का, असा प्रतिसवालही महाडेश्वर यांनी केला. एवढेच नव्हे तर सर्व मुंबईकर आनंदी असल्याचेही त्यांनी सांगितले.

महापौरांच्या या वक्तव्यानंतर सामान्य मुंबईकरांकडून संताप व्यक्त केला जात आहे. शहरातील व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाल्यानंतर पालिका आणि महापौरांना परिस्थितीचे गांभीर्य नाही, अशा प्रतिक्रिया मुंबईकरांनी व्यक्त केल्या आहेत. पावसाळ्यापूर्वीचे नालेसफाईची कामे पूर्ण झाल्याचा दावा पालिकेकडून केला जात होता. तसेच पाणी उपसण्यासाठी पंपिंग स्टेशन्स उभारण्यात आल्याचे पालिकेकडून सांगितले जात होते. मात्र, काल रात्रीपासून पडत असल्यामुळे हिंदमाता, किंग्ज सर्कल हे परिसर नेहमीप्रमाणे जलमय झाले होते. सायनच्या गांधी मार्केटमध्येही हीच परिस्थिती होती. कुर्ला, सांताक्रुझ परिसरातही पाणी तुंबल्याने कुर्ला डेपो ते बीकेसी पर्यंत वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली होती. याशिवाय, लबाग, दादर, हिंदमाता, कुर्ला, सायन, माटुंगा, चेंबूर, गोवंडी, किंग्ज सर्कल, धारावी, भांडूप, कांजूरमार्ग, वरळी, विक्रोळी आणि घाटकोपर परिसरातही पाणी साचल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला.

## मी माझ्या राजीनाम्याच्या निर्णयावर ठाम-राहुल गांधी



**वृत्तसंस्था / ०१ जुलै**

**नवी दिल्ली :** काँग्रेस अध्यक्षपदावरुन पायउतार होण्याच्या निर्णयावर आपण ठाम असल्याचं पुन्हा एकदा राहुल गांधी यांनी स्पष्ट केलं आहे. ज्येष्ट काँग्रेस नेते आणि राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी विनंती करुनदेखील राहुल गांधी यांनी माघार घेण्यास नकार दिला आहे. अशोक गेहलोत यांनी ट्विट करत सध्याच्या परिस्थितीत राहुल गांधी पक्षाचं नेतृत्त्व करण्यात सक्षम असल्याचं म्हटलं होतं.

सध्या जी परिस्थिती आहे ती पाहता फक्त राहुल गांधीच पक्षाचं नृेत्तत्व करु शकतात असं आम्हाला वाटतं, देशाच्या भल्याकरिता तसंच देशवासियांसाठी असणाऱ्या त्यांच्या बांधिलकीची तुलना होऊ शकत नाही, असं अशोक गेहलोत यांनी म्हटलं होतं.

अशोक गेहलोत यांच्या या ट्विटवर प्रतिक्रिया देताना राहुल गांधी यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं की, मी माझा निर्णय घेतला आणि तुम्हा सर्वांना त्याची माहिती आहे. काँग्रेसशासित राज्यांचे मुख्यमंत्री भेट घेण्याच्या काही वेळ आधी राहुल गांधी यांनी हे वक्तव्य केलं. राहुल गांधी यांची भविष्यात नेमकी काय भूमिका असणार आहे यावरुन व्यक्त होणारे तर्क-वितर्क तसंच यावरुन सुरु असलेल्या राजीनाम्याचं सत्र याच पार्श्वभुमीवर ही बैठक होणार आहे.

**फक्त राहुल गांधींच काँग्रेसचं नेतृत्त्व करु शकतात अशोक गेहलोत**

काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांच्यासोबत होणाऱ्या बैठकीआधी बोलताना ज्येष्ट काँग्रेस नेते आणि राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी राहुल गांधीच काँग्रेसचं नेतृत्त्व करु शकतात असं वक्तव्य केलं आहे. राहुल गांधी यांनी राजीनाम्याचा प्रस्ताव सादर केल्यापासून पहिल्यांदाच काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहेत.

पुढे बोलताना त्यांनी सांगितलं होतं की, काँग्रेसशासित सर्व राज्यांचे मुख्यमंत्री राहुल गांधी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेणार आहेत. याआधीही आम्ही सर्व मुख्यमंत्र्यांनी २०१९ लोकसभा निवडणुकीतील पराभवाची जबाबदारी आम्हा सर्वांची असल्याचं सांगितलं होतं.

## शिर्डीत प्रसादामध्ये गुंगीचे औषध टाकून साईभक्तांना लुटणाऱ्या महिलेला पकडले

### मंदिर परिसरात खळबळ



**विशेष प्रतिनिधी/ ०१ जुलै**

**शिर्डी :** शिर्डी साईबाबा मंदिर परिसरात संस्थानच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्रसादात गुंगीचे औषध टाकून साई भक्तांना लुटणाऱ्या एका महिलेला साई संस्थानच्या सुरक्षारक्षकांनी आज पकडले. या घटनेने शिर्डी परिसरात खळबळ उडाली असून या महिलेला शिर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

१९ जून रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास शिर्डीतील बिरोबा कॉलनी येथील वयोवृद्ध महिला छबुबाई गरड या नेहमीप्रमाणे दररोज साईबाबांची दुपारची मध्यान्ह आरती करुन आरतीचा प्रसाद घेण्यासाठी गुरुस्थान मंदिरा जवळ गेल्या होत्या.

यावेळी तिथून एक महिलेने जवळ येऊन त्यांना प्रसाद दिला.

छबुबाई यांनी प्रसाद खाल्यांनतर थोड्याच वेळात गुंगी येऊन पडल्या. त्यांनी थोड्या वेळाने उठून पाहिलं असता त्यांच्या गळ्यातील दागिणे गायब झाले होते. आपल्या गळ्यातील तीन ग्रॅम सोन्याची पोत आणि काही पैसे घेऊन एक महिला गेली असल्याची माहिती छबुबाई यांनी संस्थानच्या सुरक्षारक्षकांना दिली होती.

या माहितीच्या आधारे संस्थानच्या सुरक्षारक्षकांनी १९ जून रोजीचे मंदिर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक केले. त्यावेळी एक महिला या वयोवृद्ध आजीच्या गळ्यातील पोत काढून घेऊन जात असल्याचा प्रकार समोर आला. यानंतर संस्थानच्या सुरक्षारक्षकांनी या महिलेचा तपास सुरु केला.

अखेर आज ही महिला पुन्हा साई मंदिर परिसरात दिसून आली. या महिलेला पकडून सुरक्षा कार्यालयात चौकशीसाठी आणले. ही महिला झारखंड येथील असून तिचे नाव पिंकी असल्याचे सांगितले आहे. साई मंदिरात या वयोवृद्ध महिलेला साई प्रसादात गुंगीचे औषध टाकून बेशुद्ध करत त्यांच्याकडील पैसे तसेच सोने काढून घेतले असल्याची कबुली पिंकीने दिली आहे. साई संस्थानने शिर्डी पोलिसात गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

## शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा- कृषिमंत्र्यांचे आदेश



**विशेष प्रतिनिधी/ ०१ जुलै**

**नाशिक :** शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या राष्ट्रीयकृत बँक अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जातील, अशी घोषणा कृषिमंत्री अनिल बोंडे यांनी आज केली. नाशिकच्या जिल्हा परिषदेत कृषी दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोंडे म्हणाले की, यापुढे राज्यात विमा कंपनीचा एक अधिकारी कृषी अधीक्षक कार्यालयात बसणार आहे. राष्ट्रीय बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ केल्यास गुन्हा दाखल करा असे आदेश कृषीमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. सोबतच बियाणे आणि खतांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर देखील कठोर कारवाई करणार असल्याचे बोंडे म्हणाले.

यावेळी बोलताना बोंडे म्हणाले की, राज्यात जलसंधारण आणि जलक्रांतीचे काम वसंतदादा नाईक यांच्या काळापासून सुरु झाले आहे. शेतीचा विकास दर कमी असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आले. शेतकऱ्यांचं उत्पादन वाढलं मात्र उत्पन्न वाढलं नाही. इतर क्षेत्रातील लोकांचे मात्र उत्पन्न वाढले, असे ते म्हणाले.देशात पहिल्यांदा नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचा उत्पन्न वाढीसंदर्भात विचार केला. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन काम करणं गरजेचं आहे. शेतकऱ्यांना मोकळीक देणे गरजेचे आहे. शेतकरी हा 'छझ अधिकाऱ्यांपेक्षा हुशार आहेत, असेही ते म्हणाले. कृषी विभागाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचं काम सक्षमपणे करणार असल्याचेही ते म्हणाले. कृषी दिनानिमित्त शेतमाऊली सन्मान सोहळा वाशिम : जिल्हा परिषद कृषी विभाग व राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयात शेतमाऊली सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील माता-भगिनींचा सन्मान शेतमाऊली सन्मान सोहळ्याच्या अंतर्गत करण्यात आला. जिल्ह्यातील सहा तालुक्यातील १२ महिलांना साडी चोळी देवून जिल्हा परिषद अध्यक्षा हर्षदा देशमुख आणि वाशीम कृषी विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.